पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/१८७२/२०२४
दिनांक : १६ /०८/२०२४

४२१

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश (अंतिम)

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश**

प्रस्तावना –

आनंदनगर, चिंचवड येथील स.नं.३११ अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि,

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२३/०१/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.०२/०२/२०२४ रोजी डकविण्यात आली असून दि.०१/०२/२०२४ रोजीच्या दै.प्रभात व दै.सिध्दांत समाचार या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, फेब्रुपरी ८-१४, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.१३ व १४ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि ,

(३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकतीवर झोपडपट्टी असलेचे दि.०२/११/२०२३ रोजीच्या प्रत्यक्ष पाहणी दरम्यान आढळून आली आहे. आणि;

(४) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे ७/१२ उता-यानुसार एकूण क्षेत्र १८१००.०० चौ.मी. इतके आहे. सदर मिळकत ही शासकीय मालकीची असून दि.२३/०१/२०२४ रोजी पूर्वसूचना आदेश प्रसिध्द करतेवेळी विकसक यांनी सदर मिळकतीचा मोजणी नकाशा सादर केला नव्हता व अंतिम ३ (क) आदेश पारित करणेपूर्वी मोजणी नकाशा सादर करणेच्या अटीवर झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कलम ३ (क) पूर्वसूचना प्रसिध्द करणेत आलेली होती. याबाबत, विकसक यांनी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील दिनांक २३/०२/२०२४ रोजीचा मोजणी नकाशा या विभागास सादर केलेला आहे. सदर मोजणी नकाशाकरुन स.नं.३११ पै, आनंदनगर या मिळकतीचे क्षेत्र १६११०.७६ इतके असलेचे दिसून येते. त्यानुसार अंतिम ३ (क) आदेशामध्ये याबाबत दुरुस्ती करुन अंतिम ३ (क) प्रसिध्द करणे आवश्यक वाटते. त्यामुळे कलम ३ (क) पूर्वसूचना आदेशामधील नमूद क्षेत्राऐवजी १६११०.७६ चौ.मी. एवढे क्षेत्र नमूद करुन व मोजणी नकाशा नुसार चतु:सिमा नमूद करुन अंतिम ३ (क) आदेशामध्ये तसा बदल करणे क्रमप्राप्त आहे ; आणि

(५) ज्याअर्थी, सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे व मे. सुदेव व्हेंचर्स यांची ३(क) पूर्वसूचना मध्ये नमूद केलेप्रमाणे विहित मुदतीत हरकत प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने स्वतंत्र निकालपत्रान्वये सदरची हरकत निकाली काढणेत आलेली आहे; आणि,

(६) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणूनघोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि,

(७) ज्याअर्थी, सदर योजनेकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे क्षेत्र १६११०.७६ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण १६११०.७६ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश :-**

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे मुंबई ,येथे अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.३११, आनंदनगर, चिंचवड.
**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव- चिंचवड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (दाखल प्रस्तावातील क्षेत्रानुसार) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | | | |
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.३११ आनंदनगर, चिंचवड | पब्लिक वर्कस् डिपार्टमेंट (महाराष्ट्र शासन) | १६११०.७६ चौ.मी. | लागू रस्ता | लागू स.नं.२४२ /ब/१पै व लागू स.नं२४२ /ब/२ पै | जागेवरील वस्तूस्थिती नुसार अंतर्गत रस्ता | लागू स.नं.२४४ अ पै |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १६/०८/२०२४

(नीलेश र.गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

सर्वे  ना.रह  कट  स.प्रा.क्र.३

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा)- यांसकडे माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत, पुणे स्टेशन रोड, पुणे-०१
४. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६